**आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे योजनेअंतर्गत बुलढाणा अर्बन फार्मर प्रोडयुसर कंपनी लि. यांच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प उभारणीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१५२४/प्र.क्र.२५४/२१-स,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक:- ०३ जून, २०२६

**संदर्भ:-**

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.कृबास-०५२३/प्र.क्र.१८३/२१-स, दि.२७/१२/२०२३.
२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.मराकृपम/ प्रकल्प/ आसंप्रकेस/ प्रस्ताव/शासन मान्यता/२३१५/२०२४, दि. २५.१०.२०२४ चे पत्र.
३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.मराकृपम/ प्रकल्प/ आसंप्रकेस/प्रस्ताव/२५४६ /२०२४, दि.१०.१२.२०२४ चे पत्र.
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.कृबास-०५२३/प्र.क्र.१८३/२१-स, दि.०८.१०.२०२५.

**प्रस्तावना:-**

नागपूर, काटोल व कळमेश्वर, जि. नागपूर व मोर्शी जि. अमरावती व संग्रामपूर जि. बुलढाणा येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारणे या योजनेस संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच, सदर योजनेस सन २०२५-२६ व २०२६-२७ या दोन आर्थिक वर्षासाठी मुदतवाढ व योजनेच्या स्वरुपात अनुषंगिक बदल करण्यास संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत प्रत्येकी रु.४.०० कोटी किंमतीचे ८ प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प मंजूर आहेत. त्याकरिता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने लाभार्थी निवडीसाठी दिलेल्या जाहिराती अन्वये प्राप्त प्रस्तावांची महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने नेमलेल्या प्रकल्प सल्लागार यांनी छाननी केली आहे. सदर छाननी अंती पात्र ठरलेल्या बुलढाणा अर्बन फार्मर प्रोडयुसर कंपनी लि. यांचा प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन

**शासन निर्णय:-**

आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे या योजने अंतर्गत मंजूर प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांपैकी बुलढाणा अर्बन फार्मर प्रोडयुसर कंपनी लि. यांच्या रु.४.००कोटी किंमतीच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प उभारणीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) सदर प्रस्तावास आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे योजनेच्या दि.२७.१२.२०२३ व दि.०८.१०.२०२५ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

२) सदर योजनेची नोडल एजन्सी म्हणून कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे हे कामकाज पाहतील. सदर योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात आवश्यक मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने त्यांच्या स्तरावर निर्गमित कराव्यात.

३) प्रस्तावास शासनाकडून मान्यता प्रदान केल्यानंतर, पणन मंडळाकडून लाभार्थ्यांस तत्वत: मान्यतेचे पत्र देण्यात येईल.

४) त्यानंतर, लाभार्थ्यांनी आवश्यकतेनुसार निविदा प्रक्रिया राबवून, कंत्राटदाराची नियुक्ती करुन प्रकल्पाचे काम सुरु करावे.

५) दि.२७.१२.२०२३ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार, सदर योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी प्रथमत: लाभार्थ्यांनी किमान १५ टक्के स्वनिधी खर्च करणे आवश्यक असून, उर्वरित ८५ टक्के अर्थसहाय्य आवश्यकतेनुसार बँकेकडून कर्जस्वरुपात घ्यावयाचे आहे.

६) प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र द्यावे.

७) सदर प्रकल्पाचा पूर्णत्वाचा दाखला शासनास सादर केल्यानंतर शासनाकडून प्रकल्प किंमतीच्या(कमाल ४ कोटी) कमाल ५० टक्के मर्यादेपर्यंतचे (कमाल २ कोटी) अनुदान महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांना वितरीत करण्यात येईल व त्यानंतर पणन मंडळामार्फत सदर अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

८) तथापि, शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, विहित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर, शासनाने निश्चित केलेल्या किंमतीपेक्षा कमी किंमतीची निविदा मंजूर झाल्यास सदर मंजूर निविदा रकमेच्या ५०% प्रमाणेच शासन अनुदान अनुज्ञेय राहील.

९) शासन अनुदानाच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

१०) प्रकल्प हाती घेतलेल्या लाभार्थ्यांनीच प्रकल्प राबविणे बंधनकारक राहील.

११) लाभार्थ्यांकडे प्रकल्पासाठी स्वत:ची किंवा भाडेतत्वावरील किमान ३० वर्ष कालावधीकरीता जागा असणे आवश्यक राहील व सदर जागा शासनाकडे mortgage गहाण राहील."

१२) प्रशासकीय मान्यतेनंतर सदर प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाचे काम सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावे.

१३) सदर प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाचा दैनंदिन खर्च, देखभाल दुरुस्ती, मनुष्यबळावरील खर्च, वीज व पाणी देयके इ.वरील खर्च हा संबंधित लाभार्थ्यांनी करणे बंधनकारक आहे. त्यासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

१४) सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेले बदल लाभार्थ्यांस बंधनकारक राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६०३१७४८५९५३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAVI SANDEEP SHINDE

Digitally signed by MADHAVI SANDEEP SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=020531E249E88FE74BF6DB805F42944E7F29BC0BA6134C83C1F183B8CC27F2FF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4CB1CBBD6A4EE442FDAA6C1B358BF61FEAF9AEFC16E8F39E9EE1D06B9E8A7A59, cn=MADHAVI SANDEEP SHINDE
Date: 2026.06.03 17:50:22 +05'30'

**(माधवी सं. शिंदे)**
**अवर सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
३. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य -२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) नागपूर.
७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. बुलढाणा अर्बन फार्मर प्रोडयुसर कंपनी लि.
१०. निवड नस्ती/२१-स.